क्षमाशीलता

महात्मा गांधींची गोष्ट

लेखिका: मेरी लोग

चित्रे: रॉबीन लॉरी







क्षमाशीलता

महात्मा गांधींची गोष्ट

मराठी अनुवादः सुशील मेन्सन



पहिला धडा



मोहनदास गांधी यांचा जन्म 1869 साली भारतातील मुंबई शहराच्या उत्तरेला असलेल्या एका छोट्या शहरात झाला. लोक त्यांना *मोहन* या नावाने हाक मारत. ते आपल्या सहा भावंडापैकी सर्वात धाकटे होते. त्यांचे आईवडील, भावंडे आणि सर्व काका, काकी, चुलत भावंडे एकाच घरात राहात. मोहनचे वडील शहराचे दिवाण होते. एखाद्या न्यायाधीशासारखे ते लोकांमधील तंटा मिटवण्याचे काम करत.



मोहनने आईकडून हिंदू धर्माची ओळख करून घेतली. ती त्याला हिंदू मंदिरात घेऊन जात असे. आपली आई गरीब, आजारी लोकांची सेवा करते, हे मोहनने तिथे पाहिले. आई धार्मिक होती आणि उपासतापास करत असे. उपवासाच्या दिवशी ती काहीही खात नसे. आईच्या या उपवास पद्धतीचा उपयोग गांधींनी पुढे आपल्या राजकीय कार्यात अनेकदा केला.


शाळेत मोहन एक लाजाळू मुलगा होता. पण घरी मात्र तो खूप बदमाषी करत असे. तो त्याच्या बहिणींच्या खोड्या काढत असे. त्यामुळे अनेकदा समस्या उद्भवत.

वयाच्या तेराव्या वर्षी मोहनचे लग्न *कस्तुरबा* नावाच्या मुलीशी झाले. त्याकाळी बालविवाह ही एक सर्वसामान्य गोष्ट होती. कस्तुरबाचे शालेय शिक्षण पूर्ण होईपर्यंत दोघे आपापल्या आईवडिलांच्या घरीच राहीले. आयुष्य कसे जगावे, हे मोहनने कस्तुरबाला सांगण्याचा खूप प्रयत्न केला पण कस्तुरबाने त्यांना नेहमीच विरोध केला. शांतपणे विरोध करण्याची आपल्या पत्नीची ही प्रवृत्ती पाहून मोहन भारावून गेला. भविष्यात इंग्रजांच्या धोरणांना विरोध करताना त्यांनी याच हत्याराचा उपयोग केला.

वयाच्या पंधराव्या वर्षी मोहनने सिगारेट ओढण्याचा प्रयत्न केला आणि नोकरांचे पैसेही चोरले. मग त्याने आपल्या भावाचे काही दागिने चोरले. पण नंतर त्याला आपल्या या कृत्यांचा पश्चाताप झाला. त्याने पत्र लिहून आपल्या कृत्यांची कहाणी आपल्या वडिलांना कळवली. आपल्याला शिक्षा करावी, असा हट्ट त्याने वडिलांकडे केला. पण त्याच्या वडिलांच्या डोळ्यात अश्रू तरळले. हे पाहून मोहनला आश्चर्य वाटले. मोहनला शिक्षा करण्याऐवजी त्यांनी त्याला क्षमा केली.



क्षमा म्हणजे काय?



समजा, तुमच्या मित्राने तुमचे सफरचंद चोरले आणि खाऊन टाकले. तुम्ही त्याला म्हटले, “हरकत नाही.” म्हणजे, तुम्ही त्याला क्षमा केली. कुणालातरी क्षमा करणे, म्हणजे तुम्ही त्याच्या कृत्यावर त्याला रागवत नाही. तुम्ही न रागवल्यामुळे तुम्हाला त्याची पर्वा आहे, असे दिसून येते. तुम्ही त्याला आणखी एक संधी देता.

इंग्लंडला प्रयाण



त्याकाळी हिंदू धर्मीय लोक जातीभेद मानत असत. त्यांच्या मते, काही लोक इतरांपेक्षा श्रेष्ठ होते. हिंदू धर्मात लोकांचे विभाजन चार समुहांमध्ये केले गेले होते: ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आणि क्षुद्र. यांपैकी क्षुद्र किंवा अस्पृश्य लोक सर्वात गरीब होते. कुणी त्यांच्याशी बोलत नसत, संबंध ठेवत नसत. मोहनचे कुटुंब व्यापाऱ्यांच्या जातीसमूहात मोडत होते.

वयाच्या अठराव्या वर्षी कुटुंबियांनी मोहनला इंग्लंडमधील एका कॉलेजात पाठवायचे ठरवले. त्याकाळात भारतावर इंग्लंडचीच सत्ता होती. त्यामुळे व्यापारी जातीसमुहाच्या नेत्यांना ही गोष्ट कळली तेव्हा ते नाराज झाले. त्यांच्या जातीसमुहात तोवर कुणी शिक्षणासाठी देश सोडून बाहेर गेले नव्हते.

पण मोहनने आपला इंग्लंडला जाण्याचा निर्धार कायम ठेवला. जातीसमुहाच्या नेत्यांनी मोहनला वाळीत टाकले. मोहनशी कुणीही संबंध ठेवायचे नाहीत, असा जणू फतवाच त्यांनी काढला. पण मोहनने कुणाबद्दल वैरभाव मनात ठेवला नाही. आपल्याला जातीत पुन्हा घेतले जावे, असा प्रयत्नही त्याने कधी केला नाही.



इंग्लंडमध्ये तीन वर्षे शिकून मोहन वकील बनला. आपण मांस, मद्य यांना स्पर्शही करणार नाही, हे आपल्या आईला दिलेले वचन त्याने पूर्णपणे पाळले.


शाकाहारी असल्यामुळे मोहनला काही अडचणी मात्र आल्या. कारण तिथे सर्वच लोक मांस खात होते. पहिले काही महिने मोहनने ब्रेड, ओटमील, कोको वगैरे खाऊन गुजराण केली. अखेरीस, त्याला एक शाकाहारी रेस्टॉरंट सापडले आणि त्याच्या जेवणाची समस्या सुटली. मोहन आयुष्यभर शाकाहारीच राहीला. फळे, भाज्या आणि भाकरी हेच त्याचे अन्न राहीले.

इंग्लंडमध्ये मोहनला भरपूर चालण्याची सवय जडली. लंडनमध्ये तो सर्वत्र पायीपायीच फिरला. यामुळे त्याच्या पैशांची बचत तर झालीच शिवाय, त्याचे आरोग्यही सुदृढ राहीले. अनेक वर्षांनंतरही तो तरुणांना लाजवेल इतक्या जलद गतीने दूरपर्यंत चालत जात असे.



अभ्यासात मोहनची प्रगती बऱ्यापैकी होती. त्याने जगाबद्दल बरेच ज्ञान मिळवले आणि इंग्रजी भाषा उत्तमपणे अवगत केली. इंग्लंडमध्ये त्याची वेगवेगळ्या लोकांशी भेट झाली. यापूर्वी कधी वाचली नव्हती अशी अनेक वृत्तपत्रे त्याने तिथे वाचली.

मोहनने अनेक धर्मांचा अभ्यास केला आणि बायबलचे वाचनही केले. पर्वतावर येशुने दिलेले प्रवचन वाचून मोहन खूप प्रभावित झाला.



"कुणी तुमच्या उजव्या गालावर चापट मारली तर तुम्ही तुमचा डावा गालही त्याच्यापुढे करा. कुणी तुमचा सदरा हिसकावू लागला तर त्याला तुमचा कोटदेखील देऊन टाका."

मोहन सतत क्षमाशीलतेचा हा धडा शिकू लागले.

बालपणी मोहनने एक कविता शिकली होती:

थोर लोक सर्वांशी समानतेने वागतात,
वाईट वागणाऱ्यांना आणिक आनंद वाटतात.

याचा अर्थ, कुणी तुमच्याशी वाईट वागले तरी तुम्ही त्याच्याशी चांगलेच वर्तन करा.

दक्षिण आफ्रिकेत एक वकील

1891 साली गांधी इंग्लंडहून परतले. त्यांना घरी परतल्याचा आनंद झाला. पण घरी एक वाईट बातमी त्यांची वाट पाहात होती. इंग्लंडहून परतण्याच्या काही महिन्यांपूर्वी त्यांच्या आईचे निधन झाले होते. यामुळे गांधी उदास झाले. आईला दिलेले वचन आपण पाळले आणि आपण वकील झालो, हे आपल्या आईला आता ते कधीच सांगू शकणार नव्हते.

भारतात गांधीची वकीली फारशी चालली नाही. त्यांना इंग्लंडमधील कायद्यांचे ज्ञान होते, पण भारतातील कायद्यांचे नव्हते. 1893 साली एका खटल्यासंदर्भात त्यांना दक्षिण आफ्रिकेत पाठवण्यात आले. या देशात एका भारतीयाने राहाणे सहजसोपे नव्हते. दक्षिण आफ्रिकेच्या काही भागात तर भारतीय लोकांना ना जमीन धारण करण्याचा हक्क होता, ना काही व्यवसाय करण्याचा! रात्री नऊ वाजल्यानंतर भारतीयांना बाहेर फिरायला जाण्यास कायद्याने मनाई होती.

एकदा गांधी रेल्वेचे पहिल्या वर्गाचे तिकीट काढून प्रवास करत होते. पण ते गोरे नाहीत, या कारणास्तव त्यांनी पहिल्या वर्गाचा डबा सोडून जावे, असे त्यांना सांगण्यात आले. गांधींनी असे करण्यास नकार दिला तेव्हा एका पोलीसाने त्यांना त्यांच्या सामानासह रेल्वेतून बाहेर काढले. गांधींना स्टेशनवर रात्र काढावी लागली. त्यांच्याकडे विचार करायला पुष्कळ वेळ होता. त्यांनी भारतीयांप्रती असलेल्या या भेदभावाविरुद्ध लढायचे ठरवले.





गांधी दक्षिण आफ्रिकेत वीसेक वर्षे राहीले. त्यांनी आपल्या पत्नीलाही तेथे बोलावून घेतले. तिथे राहाणाऱ्या भारतीय लोकांचे ते नेते बनले. भारतीय लोकांचे आयुष्य सहजसोपे व्हावे, या दृष्टीने त्यांनी बरेच काम केले. त्यांनी एक वृत्तपत्र सुरू केले तसेच एक मोठे शेत खरेदी केले. तिथे भारतीय लोक परस्परांना मदत करण्यासाठी एकत्र काम करत. हे लोक तिथे आपले कपडे स्वतःच बनवत आणि शेतीसुद्धा करत. त्यांनी शेतात संत्री पिकवली तसेच भाकरीसाठी लागणारा गहूदेखील स्वतःच पिकवला.



दक्षिण आफ्रिकेच्या सरकारने भारतीय नागरिकांवर एक विशेष स्वरुपाचा कर लादला. गांधींनी लोकांना हा कर न भरण्यास सांगीतले आणि लोकांनी त्यांचे ऐकले. कर भरण्यास नकार दिल्यामुळे *जनरल स्मट्स* या पोलीस अधिकाऱ्याने गांधींना तुरुंगात डांबले. तिथे मिळालेला मोकळा वेळ गांधींनी वाचन आणि चिंतन करण्यात घालवला. शेतावर मिळवलेले ज्ञान वापरून त्यांनी तुरुंगात चपलाही बनवल्या. अखेरीस, लोकांचा रोष वाढू लागल्याने जनरल स्मट्स यांना गांधींना सोडून द्यावे लागले.

सरकारने भारतीयांना मुक्तपणे जगण्याचे स्वातंत्र्य देणारा कायदा करेपर्यंत गांधी दक्षिण आफ्रिकेतच राहिले. गांधींनी जनरल स्मट्सना भेटस्वरुप म्हणून तुरुंगात बनवलेल्या चपला पाठवल्या आणि त्यांना क्षमा केल्याचे संकेत दिले.



गांधींना वाईटाविरुद्ध लढण्याचा एक नवा मार्ग सापडला. ते त्याला सत्याग्रह म्हणत. त्याचा अर्थ आहे, *सत्याचे बळ.* लोक याला *शांतीपूर्ण विरोध* म्हणू लागले. बंदुका आणि मारामारी यावर गांधींचा विश्वास नव्हता. त्यांच्या मते, कुणाशी लढायचे असेल तर सर्वोत्तम मार्ग आहे, *अशी कृती करू नका जे समोरचे तुमच्याकडून करून घेऊ इच्छितात.*

भारतात परतले




गांधी 1911 साली भारतात परतले तेव्हा भारतावर ब्रिटिशांचीच सत्ता होती. भारतीय मसाले, वस्त्रे आणि इतर साधनसंपत्ती यांतच ब्रिटिशांना रस होता. ते भारतातून हा माल घेऊन जात आणि हाच माल पुन्हा भारतीय लोकांना चढ्या किंमतीने विकत.

ब्रिटिशांनी भारतीय लोकांना आपला देश परत करावा, अशी गांधींची इच्छा होती. आपल्या देशावर भारतीय लोकांनीच राज्य करावे, असे त्यांना मनोमन वाटत होते. गांधींनी आपले उर्वरीत आयुष्य हे उद्दिष्ट साध्य करण्यातच घालवले.

पण यापेक्षाही आपल्या देशात सर्व लोक समान असावेत, अस्पृश्य म्हणून कुणी कुणाला दूर करू नये असा स्वतंत्र भारत त्यांना हवा होता.

वकिली व्यवसायात गांधींनी भरपूर पैसा कमावला, परंतु आपले राहाणीमान त्यांनी साधेच ठेवले. त्यांच्या पत्नीसाठी आणि इतर कुटुंबियांसाठी ही गोष्ट कठीण होती. गांधींनी आपला पैसा गरीबांना मदत करण्यात खर्च केला. ते सर्वत्र पायीपायीच फिरत असत. अंगावर एक धोती आणि पायात चप्पल इतकाच पेहराव ते करत. देशभर फिरून त्यांनी लोकांच्या गरजा समजून घेतल्या.

डोळ्यांवर चष्मा आणि बारीक लहानखुरा बांधा असे गांधी फार लोकप्रिय होते. लोक त्यांना *महात्मा*, म्हणजे महान आत्मा, म्हणू लागले. अनेक लोक त्यांना संत मानत, कारण त्यांचे वर्तन फारच चांगले होते.



लोक आपल्याला संत मानतात, ही गोष्ट गांधी हसण्यावारी नेत. एकदा गांधींसोबत रेल्वेतून प्रवास करणारी एक व्यक्ती प्लॅटफॉर्मवर पडली. पण त्या व्यक्तिला इजा झाली नाही. ती व्यक्ती गांधींना म्हणू लागली की तो त्यांच्यासारख्या संत व्यक्तिसोबत बसला होता, म्हणूनच वाचला. गांधी हसतहसत त्याला म्हणाले, “मग खरंतर तू प्लॅटफॉर्मवर पडायलाच नको होतास!”







भारताला स्वातंत्र्य हवे असेल तर भारतीयांनी ब्रिटिश माल खरेदी करणे थांबवले पाहिजे, हे गांधींना जाणवले होते. त्यांनी लोकांना इंग्लंडमध्ये बनणारे कपडे खरेदी करू नका, असे सांगितले. जिथेजिथे ते गेले, त्यांनी लोकांना चरखे दिले, जेणेकरून लोक आपले कपडे स्वतःच बनवू शकतील. लोकांनी स्वयंपूर्ण व्हावे, त्यामुळे त्यांना ब्रिटिशांची गरजच पडणार नाही असे त्यांना वाटत होते.

सर्वांनाच मीठाची गरज असते. भारताच्या संपूर्ण किनारपट्टी भागात हे मीठ बनते. मीठ समुद्राच्या पाण्यापासून तयार होते. परंतु हे मीठ गोळा करण्यास ब्रिटिशांनी भारतीयांना मनाई केली. हे मीठ काही ब्रिटिश कंपन्या गोळा करू लागले आणि पुन्हा ते भारतीयांना विकू लागले.

गांधींना ब्रिटिशांची ही अरेरावी पटली नाही. त्यांनी एक आंदोलन सुरू केले, *मीठाचा सत्याग्रह*. हजारो लोक गांधींसोबत समुद्रतटाकडे चालू लागले. समुद्रकिनाऱ्यावर गांधींनी मूठभर मीठ उचलले. इतर लोकांनी त्यांचे अनुकरण केले. ब्रिटिश सरकारने गांधींना अटक केले. लोकांनी मात्र आंदोलन सुरूच ठेवले. ते ब्रिटिशांना विरोध करत राहिले. परंतु त्यांनी हिंसा मात्र केली नाही.



मी आज जे काही केले ती खूप लहानशी बाब होती. ब्रिटिश मला माझ्या स्वतःच्या देशात आदेश देऊ शकत नाहीत, हे मला त्यांना दाखवायचे होते. - गांधी



सर्वश्रेष्ठ मानव

1931 साली टाइम मासिकाने *मॅन ऑफ द इयर* म्हणून गांधींची निवड केली. गांधी हे जगभरातील सर्वाधिक महत्त्वाच्या व्यक्तिंमध्ये गणले गेले. यानंतरही त्यांचे राहाणीमान साधेच राहिले. भारताच्या स्वातंत्र्याचा लढा त्यांनी सुरुच ठेवला. परंतु ब्रिटिश भारतावरची सत्ता सोडून द्यायला तयार नव्हते.





एकदा गांधी ब्रिटिश पंतप्रधानांना भेटण्यास इंग्लंडला गेले. त्यांच्या अंगावर फक्त धोती, शाल आणि पायात चपला होत्या. गांधींच्या या पेहरावावर कुणीतरी आश्चर्य व्यक्त केले. गांधी मिश्किलपणे उत्तरले, “गरजच वाटली नाही. ब्रिटिश पंतप्रधानांनी आम्हा दोघांना पुरतील एवढे कपडे घातले आहेत.”

दुसरे महायुद्ध सुरू झाले. भारताने आपल्या बाजूने लढावे अशी ब्रिटिश सरकारची अपेक्षा होती. तर ब्रिटिशांनी भारत सोडून जावे, अशी गांधींची इच्छा होती. त्यांना भय होते की इंग्रजांवर सूड उगवण्यासाठी जपानी सैन्य भारतावर हल्ला करेल.



लोकांना चिथावणी देऊन दंगल भडकवल्याचा आरोप ठेवून ब्रिटिश सरकारने गांधींना तुरुंगात डांबले. गांधींनी तुरुंगात अन्नाचा त्याग केला. आपली आई करायची तसा कडक उपवास त्यांनी सुरू केला. कित्येक दिवस उपवास केल्यामुळे ते खूप अशक्त झाले. उपवासाने तुरुंगात गांधींचा मृत्यू होईल, या भीतीने ब्रिटिशांनी त्यांची सुटका केली.




1947 साली महायुद्ध संपल्यावर ब्रिटिशांनी भारताला स्वातंत्र्य दिले. संपूर्ण भारतभर हा दिवस साजरा झाला. भारतीय काँग्रेसच्या अध्यक्षांनी गांधींना *भारताचे राष्ट्रपिता* म्हणून घोषीत केले. गांधी, त्यांच्यासोबत चालणारे त्यांचे अनुयायी, गांधींचा गोल चष्मा आणि चरखा हे सारे स्वतंत्र भारताचे प्रतिक बनले.

पण या दिवशी गांधी पुस्तके वाचत, प्रार्थना करत घरीच राहिले, राजकारणापासून दूर! आपल्याला 125 वर्षे जगायचे आहे, असे ते नेहमी म्हणत. परंतु आता त्यांना तशी खात्री वाटत नव्हती. त्यांचे वय 78 वर्षे झाले होते. अतिश्रमामुळे ते थकून गेले होते.

एक दिवस भारताला स्वातंत्र्य नक्की मिळेल, अशी आशा गांधी सदोदीत बाळगत. “मी नेहमी आशावादी विचार करतो. अद्यापतरी मला जमीन दिसलेली नाही, हे मी मान्य करतो. पण अखेरच्या क्षणापर्यंत कोलंबसला तरी कुठे जमीन दिसली होती!”


अंतिम लढा



भारत स्वतंत्र झाला आणि दोन धार्मिक गटांमध्ये दंगे उसळले. मुस्लिम आणि हिंदू लोक आपसांत लढू लागले. मुस्लिमांना आपला स्वत:चा देश हवा होता. गांधींची इच्छा होती की सर्वधर्मीयांनी गुण्यागोविंदाने एकत्र राहावे. परंतु या दोन धर्मांच्या लोकांचे वास्तव्य असलेल्या शहरात भयानक दंगे सुरू झाले.


गांधींनी पुन्हा एकवार उपोषण सुरू केले.

लोकांनी हिंसा बंद केल्याशिवाय आपण अन्न ग्रहण करणार नाही, हे त्यांनी ठामपणे सांगितले. तीन दिवसांनंतर, हिंदू, मुस्लिम आणि ख्रिश्चन नेत्यांनी एकमेकांसोबत मित्रत्व राखण्याचे वचन दिले. गांधींनी मोसंबीचा रस घेतला आणि उपोषण संपवले.




परंतु गांधींच्या अथक प्रयत्नांनंतरही देशाचे विभाजन झाले. हिंदू भारतात राहिले. मुस्लिमांनी *पाकिस्तान* नावाचा देश स्थापन केला. भारतीयांसाठी ही मोठी गंभीर परिस्थिती होती. लाखो लोकांनी आपले घरदार, कामधंदा सोडून स्थलांतर केले. भारताच्या विभाजनाच्या धक्क्यातून गांधीं कधीच सावरले नाहीत. आपले प्रयत्न कमी पडले, ही बोच त्यांच्या मनात राहिली.





"भारताचे स्वातंत्र्य हेच आपल्यासाठी सर्वकाही आहे. परंतु ही गोष्ट संपूर्ण जगासाठीही महत्त्वाची आहे. अहिंसेतून मिळालेले स्वातंत्र्य हा एक नवा संदेश जगाला मिळाला आहे."- गांधी

अंतिम क्षमा



एकदा गांधी आपल्या एका अनुयायाला म्हणाले, “कुणी मला ठार मारण्याचा प्रयत्न केला तर माझ्या शेवटच्या श्वासातून मी परमेश्वराचे नाव घेईन. मी खुन्याला क्षमा करीन.”

तीनच दिवसांनी, 30 जानेवारी 1948 रोजी, गांधी एका प्रार्थनासभेला गेले. तेथे त्यांचे अनुयायी आणि मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते. लोकांमधून वाट काढत ते मंचावर जाऊ लागले. आपले दोन्ही हात जोडून त्यांनी लोकांना अभिवादन केले.

गांधींना भारताच्या विभाजनासाठी जबाबदार ठरवणारी एक हिंदू व्यक्ती गांधींनजिक आली. त्या व्यक्तिने गांधींवर पिस्तूल रोखली आणि तीन गोळ्या झाडल्या. गांधी त्यांच्या मित्रांच्या बाहुंमध्ये कोसळले. देवाचे नाव घेत त्यांनी आपल्या खुन्याला क्षमा केली. खुन्याला अटक होऊन फाशीची शिक्षा सुनावण्यात आली.




खुन्याला फाशी देण्यात येऊ नये, असे गांधींच्या मुलांना वाटत होते. गांधींनाही ते आवडले नसते, असे त्यांचे म्हणणे होते. त्यांच्या वडिलांनी खुन्याला क्षमाच केली असती. परंतु कुणीही त्यांचे ऐकले नाही. खुन्याला फासावर लटकवण्यात आले.




“मी जाणुबुजून कुणालाही दुखवू शकत नाही, विशेषत: जित्याजागत्या मनुष्यप्राण्याला तर नाहीच नाही, भले त्याने माझ्याशी कितीही मोठे दुर्वर्तन केलेले असेल.” – गांधी

अंत्यसंस्कार

गांधींच्या अंत्यसंस्कारसमयी सुमारे पाच लाख लोक उपस्थित होते. सैन्यदलाची शस्त्रास्त्रे वाहून नेणाऱ्या भल्यामोठ्या गाडीवर त्यांचे पार्थिव ठेवले होते. ती गाडी फुलांनी मढवली होती. वरून आभाळातून विमाने गांधींच्या पार्थिवावर पुष्पवृष्टी करत होती. संपूर्ण जगभरातून लोकांनी गांधींच्या मृत्यूवर शोक व्यक्त केला.






भारतात तसेच संपूर्ण जगभरात गांधींना कुणी विसरू शकलेले नाही. भारतातील बऱ्याचशा शहरांमध्ये गांधींचे पुतळे उभारलेले आहेत.



परंतु गांधींनी ज्या गोष्टींसाठी संघर्ष केला त्यात आजही फारसा फरक पडलेला दिसत नाही. आजही भारतात अस्पृश्य समजले जाणारे लोक अत्यंत हलाखीत राहात आहेत. स्त्रियांना अद्याप सन्मानाने वागवले जात नाही. लहान मुलींना अनाथालयात सोडून दिले जाते. कारण त्यांच्या कुटुंबियांना मुलगी नको आहे. चरख्याला तर लोक साफ विसरुनच गेले आहेत. भारत बराचसा पक्का माल श्रीमंत, औद्योगिक राष्ट्रांकडून खरेदी करतो.

परंतु गांधींनी जगाला हिंसेविरुद्ध लढण्याचा एक नवा मार्ग दाखवला. त्यांनी लोकांना साधे राहाणीमानही शिकवले. त्यांनी लोकांना कठीण समस्यांची जाणीव करून दिली. त्यांपैकी काही समस्यांवर उपायही सुचवले. लोकांना मदत करण्यासाठी आणि देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी पराकाष्ठा केली. त्यांनी जग बदलून टाकले. सर्वात महत्त्वाचे, त्यांनी लोकांना एकमेकांना क्षमा करण्यास शिकवले.



"असा हाडामांसाचा माणूस या पृथ्वीतलावर होऊन गेला, यावर भविष्यातील पिढ्या कदाचित विश्वास ठेवू शकणार नाहीत." अल्बर्ट आइनस्टाईन, महात्मा गांधी यांच्याविषयी काढलेले उद्गार.

1. तुम्हाला कोणते गुण सर्वाधिक महत्त्वाचे वाटतात? गांधींना कोणते गुण सर्वाधिक महत्त्वाचे वाटत?

2. क्षमाशीलता हे मूल्य गांधींना सर्वात महत्त्वाचे वाटे. सर्वच लोक चांगले असतात, त्यामुळे चूक करणाऱ्या व्यक्तिला सुधारणेची संधी द्यावी, असे ते म्हणत. तुम्ही कुणाला क्षमा केली आहे? कुणा दुसऱ्या व्यक्तिने तुम्हाला क्षमा केली आहे?

3. हिंदू धर्मात समाज जातीपातींमध्ये विभागलेला होता. अमेरिकेत अशी भेदभावाची पद्धत आहे का? अमेरिकेतील समाज कशामध्ये विभागलेला आहे?

4. गांधींचा मृत्यू 1948 साली झाला, परंतु त्यांची मूल्ये आजदेखील जिवंत आहेत. काहींच्या मते, *अहिंसक मार्गाने सत्याग्रह* हे फक्त भारतातच शक्य आहे. काहींच्या मते, गांधी काळाच्या पुढे होते. चर्चा करून युद्ध टाळावे, असे ते म्हणत. गांधींचा प्रभाव असलेला अमेरिकी नेता कोण?

5. गांधींचे राहाणीमान साधे होते. त्यांनी आपला पैसा गरींबांवर खर्च केला, धोती आणि चपला इतका साधा पेहराव केला. ते एका छोट्याशा खोलीत राहात. एक घड्याळ, चष्मा आणि खाण्यासाठी दोन कटोरे हीच त्यांची संपत्ती होती. त्यांनी अशी जीवनपद्धती का स्वीकारली ?



अभ्यास

1. गांधींनी जे काही केले त्यासाठी अनेक गुण आवश्यक होते. स्वातंत्र्यासाठी संघर्ष करताना त्यांची चिकाटी आणि कणखरपणा पणाला लागला. इतरांशी शांततापूर्ण वर्तन करताना अंगी केवळ धैर्य असून भागत नाही. आपल्यावर नाराज असलेल्या लोकांशीही ते संयमाने आणि क्षमाशीलतेने वागत. गांधींप्रमाणेच आपणही अनेक गुणावगुणांनी बनलेलो आहोत.

2. आपण काहीही विचार न करता लोकांना क्षमा करून टाकतो. बसमध्ये कुणी आपल्या सीटवर बसले आणि त्यासाठी आपली क्षमा मागितली तर आपण "हरकत नाही," असे म्हणतो. काहीवेळा मात्र एखाद्याला क्षमा करणे आपल्याला कठीण जाते, विशेषत: कुणी आपल्याला शिवी दिली किंवा आपली आवडती वस्तू तोडली तर! अशा परिस्थितीतही आपण त्याला क्षमा केली तर आपल्याला स्वत:लाच खूप बरे वाटते.


3. लोक किती पैसा कमावतात, यानुसार अमेरिकी समाज आर्थिक वर्गांमध्ये विभागलेला आहे. वरच्या वर्गातील लोकांकडे गरजेपेक्षा जास्त पैसा आहे. मध्यम वर्गातील लोकांकडे सुखसोयींनी युक्त जीवन जगता येईल इतपत पैसा आहे. खालच्या वर्गातील लोकांकडे उपजीविकेचे साधन नाही किंवा ते पुरेसा पैसा कमवू शकत नाहीत. या वर्गपद्धतीत कुणालाही एक वर्गातून दुसऱ्या वर्गात जाण्याचे स्वातंत्र्य मात्र आहे.

4. डॉ. मार्टिन ल्युथर किंग ज्युनियर, यांच्यावर गांधीचा खूप प्रभाव होता. त्याकाळी कृष्णवर्णीय लोकांना काही रेस्टॉरंटमध्ये जाण्यास किंवा बसमध्ये सर्वात पुढे बसण्यास मज्जाव होता. डॉ. किंग यांनी आपल्या कृष्णवर्णीय लोकांना गांधींच्या मार्गाने या भेदभावाविरुद्ध लढण्यास शिकवले. कृष्णवर्णीयांनी बसमध्ये पुढे बसून आणि हव्या त्या रेस्टॉरंटमध्ये जाऊन या भेदभावाला विरोध केला.

5. आपल्याकडे आलिशान गाडी, मोठे घर, भरपूर दागिने असावेत असे लोकांना वाटते. पण हे सारं मिळाल्यावर ही संपत्तीच त्यांची मालक बनते. गांधींना भारतातील लोकांना मदत करण्यावर आपले सारे लक्ष केंद्रित करायचे होते. त्यांना आपल्या मार्गावरून ढळायचे नव्हते. त्यामुळेच त्यांनी अत्यंत साधे राहाणीमान स्वीकारले होते.



महात्मा गांधी: कालानुक्रम



1869 मोहनदास गांधी, भारतात मुंबईनजिक जन्म झाला.

1882 मोहन आणि कस्तुरबा यांचे लग्न झाले.

1887 गांधी इंग्लंडमधील कॉलेजमध्ये शिकायला गेले. तिथे त्यांनी कायदा विषयाचा अभ्यास केला आणि वकील बनले.

1891 गांधी भारतात परतले.

1893 गांधी आणि कस्तुरबा दक्षिण आफ्रिकेत गेले. ते तेथील भारतीय लोकांचे नेता बनले.

1911 गांधी भारतात परतले. त्यांनी साधे राहाणीमान स्वीकारले आणि आपला पैसा गरिबांवर खर्च केला. भारतीय लोकांच्या हक्कांसाठी ते संघर्ष करू लागले.

1947 भारताने ब्रिटिशांकडून स्वातंत्र्य मिळवले.

1948 30 जानेवारी, 1948 रोजी प्रार्थनासभेत गांधींची हत्या झाली.

अंत